**<u>मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीची २४३ वी बैठक</u>**

| | |
|---|---|
| **दिनांक :** | **१६ ऑगस्ट, २०१४ (शनिवार)** |
| **वेळ :** | **सायंकाळी ४.३० वाजता** |
| **स्थळ :** | **मुख्य सचिव यांचे समिती कक्ष,<br>सहावा मजला, मंत्रालय<br>मुंबई - ४०० ०३२.** |

**<u>उपस्थित सदस्य :</u>**

| | | |
|---|---|---|
| श्री. स्वाधीन क्षत्रिय<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री. ना. वि. मेराणी | - | सदस्य |
| श्री. मनुकुमार श्रीवास्तव<br>प्रधान सचिव (१),<br>नगर विकास विभाग | - | सदस्य |
| श्री. देबाशिष चक्रबर्ती<br>प्रधान सचिव,<br>गृहनिर्माण विभाग | - | सदस्य |
| श्री. संजय भाटिया<br>व्यवस्थापकीय संचालक,<br>सिडको, मुंबई. | - | सदस्य |
| श्री. यु.पी.एस. मदान<br>महानगर आयुक्त,<br>मुं.म.प्र.वि.प्राधिकरण | - | सदस्य |
| श्री. एस. व्ही. आर. श्रीनिवासन<br>अति. महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका<br>(महापालिका आयुक्त यांचे प्रतिनिधी) | - | सदस्य |

**<u>निमंत्रित :</u>**

श्री. संजय सेठी
अति.महानगर आयुक्त (१)/प्रकल्प संचालक,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. वेणूगोपाल रेड्डी
अति.महानगर आयुक्त (२),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. सु. ल. पिंपळखुटे
वित्त सल्लागार, वित्त व लेखा विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. श. म. सबनीस
मुख्य अभियंता, अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. स. भ. तामसेकर
मुख्य अभियंता, अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. वि. ग. पाटील
प्रमुख, सामाजिक विकास कक्ष,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. अ. रा. वानखेडे
उप महानगर आयुक्त (भूमी / मिळकत)
भूमी शाखा, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. दि. न. कवठकर
सह प्रकल्प संचालक (जनसंपर्क) आणि
उप महानगर आयुक्त (प्रशासन) (अति.कार्यभार),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. एस. सी. देशपांडे
सह-प्रकल्प संचालक (नगर नियोजन),
माहिती व तंत्रज्ञान कक्ष,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. रा. म. गोटाफोडे
मुख्य लेखा अधिकारी, वित्त व लेखा विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. उ. गं. भार्गव
प्रशासकीय अधिकारी

श्री. संजय नानावटे
सचिव,
कार्यकारी समिती

बैठकीच्या सुरुवातीस, प्राधिकरणाच्या वतीने मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांचे महानगर आयुक्त यांनी स्वागत केले.

..३/-

त्यानंतर, मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत केले.

त्यानंतर, विषय पत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ०४ जुलै, २०१४ रोजी झालेल्या २४२व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ०४ जुलै, २०१४ रोजी झालेल्या २४२व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

कार्यवाही अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र.३ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत वांद्रे-कुर्ला संकुलातील जी-ब्लॉक ते पूर्व द्रुतगती महामार्ग यांच्या दरम्यान उन्नतमार्ग बांधण्याच्या कामासाठी व व्हि.एन.पुरव मार्गावरील चुनाभट्टी येथील रेल्वे क्रॉसिंगच्या जागी रेल्वे उड्डाणपूल बांधण्याच्या कामासाठी कंत्राटदाराच्या नेमणूकरीता मान्यता मिळणेबाबत.**

३.१ या प्रकल्पाची माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, पूर्व उपनगरांमधून वांद्रे-कुर्ला संकुलामध्ये येणा-या वाहनांची संख्या लक्षणीय असून या वाहनांना सध्या पूर्व द्रुतगती महामार्गावरुन धारावीमार्गे वांद्रे-कुर्ला संकुलामध्ये यावे लागते. धारावीमध्ये होणा-या वाहतूक कोंडीमुळे या प्रवासास विलंब होतो. याकरीता वांद्रे-कुर्ला संकुलातील जी-ब्लॉक ते पूर्व द्रुतगती महामार्ग यांच्या दरम्यान उन्नतमार्ग बांधण्याचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे हाती घेण्यात आले आहे. या प्रकल्पामुळे पूर्व द्रुतगती महामार्गाकडून वांद्रे-कुर्ला संकुलाकडे येण्यास लागणारा वेळ कमी होणार असून त्यामुळे शीव, धारावी या ठिकाणी होणारी वाहतूक कोंडीही कमी होण्यास मदत होणार आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीने दिनांक २९ ऑक्टोबर, २०१३ रोजी झालेल्या २३९व्या बैठकीत सदर प्रकल्पाच्या रु.३०० कोटी खर्चास प्रशासकीय मंजूरी दिली आहे.

३.२ याबाबत अधिक माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, प्रकल्पाची आखणी वांद्रे-कुर्ला संकुलातील 'जी ब्लॉक' येथून सुरु होऊन मिठी नदीवरुन धारावी - चुनाभट्टी - सोमय्या ट्रस्ट मैदान ते पूर्व द्रुतगती महामार्ग अशी आहे. या आखणीमध्ये मिठी नदीवरील पूल, शीव स्थानकाजवळ मध्य रेल्वेवरील रेल्वे ओलांडणी पुल व चुनाभट्टी स्थानकाजवळ हार्बर रेल्वेवरील रेल्वे ओलांडणी पुल यांचा समावेश आहे. या उन्नतमार्गाची लांबी सुमारे १.६ कि. मी. असून रुंदी सुमारे १७.२ मी. आहे. ४ मार्गिकांच्या (२ + २) या उन्नतमार्गाची अंदाजित किंमत रु.२०३ कोटी आहे.

३.३ रेल्वे प्राधिकरणाने विनंती केल्यानुसार सदर प्रकल्पाच्या वावामध्ये व्हि.एन.पुरव मार्गावरील रेल्वे फाटकाच्या ठिकाणी रेल्वे ओलांडणी पुल बांधण्याचा अंतर्भावही करण्यात आला आहे. २ मार्गिकांचा (१ + १) हा रेल्वे ओलांडणी पुल ८.५ मी. रुंदीचा आहे.

३.४ त्यानंतर महानगर आयुक्त यांनी असे नमूद केले की, या प्रकल्पाकरिता मार्च, २०१४ मध्ये ठोक रक्कमी पध्दतीवर (Lump-sum basis) ई-निविदा मागविण्यात आल्या. ई-निविदा संकेतस्थळावर अपलोड करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत (दिनांक १४ जुलै, २०१४) ५ निविदाकारांनी त्यांच्या ई-निविदा सादर केल्या. निविदेतील तरतूदींनुसार कंत्राटदारांकडून प्राप्त प्रस्तावांची छाननी केली असता सर्व ५ निविदाकार, त्यांचे आर्थिक देकार असणारे लखोटा क्र.३ उघडण्यास पात्र आढळून आले. त्यास अनुसरुन दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ रोजी ५ निविदाकारांचे आर्थिक देकार उघडण्यात आले. निविदाकारांच्या आर्थिक देकारांचे विवरण पुढीलप्रमाणे :-

**प्रकल्पाची अंदाजित किंमत : रु.२०३ कोटी**

| अ.क्र. | निविदाकाराचे नाव | आर्थिक देकार | शेरा |
|---|---|---|---|
| १. | मे. गॅमन इंडिया लि. | रु.२२२.२२० कोटी | -- |
| २. | मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्ट्स लि. | रु.१५५.७०० कोटी | सर्वात कमी किंमतीची |
| ३. | मे. जेएमसी प्रोजेक्ट्स इंडिया लि. | रु.१९९.२६० कोटी | -- |
| ४. | मे. लार्सन अँड टुब्रो लि. | रु.१९७.५६० कोटी | -- |
| ५. | मे. सिंप्लेक्स इन्फ्रास्ट्रक्चर्स लि. | रु.२४४.४२२ कोटी | -- |

३.५ मे. जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्ट्स लि. यांची निविदा (रु.१५५.७०० कोटी) ही सर्वात कमी किंमतीची (अंदाजित किंमतीच्या २३.३ % कमी) असून सदर निविदेच्या कमी किंमतीबाबत मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्ट्स लि. यांचेकडून खुलासा मागविण्यात आला. मे. जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्ट्स लि. यांचेकडून सदर खुलासा प्राप्त झाला आहे असे महानगर आयुक्त यांनी नमूद केले. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या निविदा समितीने, मे. कुमार इन्फ्राप्रोजेक्ट्स लि. यांचेकडून प्राप्त झालेला खुलासा स्विकृत करण्यायोग्य असून सदर निविदाकाराने सादर केलेली रु.१५५.७०० कोटी ही सर्वात कमी किंमतीची (अंदाजित किंमतीच्या २३.३ % कमी) निविदा स्विकृत करण्याची शिफारस केली आहे असेही महानगर आयुक्त यांनी पुढे नमूद केले.

३.६ श्री. ना. वि. मेराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी प्रकल्पास कोस्टल रेग्युलेशन झोन विषयक मान्यता (CRZ Clearance) प्राप्त झाली आहे किंवा कसे याबाबत विचारणा केली. महानगर आयुक्त यांनी याबाबत असे सांगितले की, नॅशनल एन्व्हायर्नमेंटल इंजिनिअरींग रिसर्च इन्स्टिटयूट (NEERI) या संस्थेतर्फे सदर प्रकल्पामुळे मिठी नदी व आसपासच्या पर्यावरणावर होणा-या संभाव्य परिणामांचा अभ्यास

करुन त्याबाबत अहवाल तयार करण्यात आला आहे. प्रकल्पास कोस्टल रेग्युलेशन झोन विषयक मान्यता प्राप्त करणेकरिता विहित नमुन्यातील अर्जासहित सदर अहवाल महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ऑथोरिटीकडून सदर प्रकल्पास कोस्टल रेग्युलेशन झोन विषयक मान्यता लवकरच प्राप्त होणे अपेक्षित आहे. श्री. ना. वि. मेराणी सदस्य, कार्यकारी समिती यांनी प्रकल्पास कोस्टल रेग्युलेशन झोन विषयक मान्यता घेण्याची कार्यवाही लवकरात लवकर व्हावी असे नमूद केले. मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी असे नमूद केले की, कोस्टल रेग्युलेशन झोन विषयक मान्यतेच्या अधीन राहून मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्ट्स लि. यांना या कामाकरिता इरादापत्र (Letter of Intent) देण्यास हरकत नसावी. सदर मान्यता प्राप्त झाल्यानंतर मे. जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्ट्स लि. यांना कार्यारंभ आदेश देण्याबाबत कार्यवाही करता येईल.

**निर्णय : चर्चेअंती, कार्यकारी समितीने पुढीलप्रमाणे ठराव मंजूर केला.**

**ठराव क्र. १२६३:**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत वांद्रे-कुर्ला संकुलातील 'जी ब्लॉक' ते पूर्व द्रुतगती महामार्ग यांच्या दरम्यान उन्नतमार्ग बांधण्याचे कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदांपैकी मे. जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्ट्स लि. यांची रु.१५५.७०० कोटी ही सर्वात कमी किंमतीची निविदा स्विकारण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** सदर प्रकल्पास प्राप्त होणा-या कोस्टल रेग्युलेशन झोन विषयक मान्यतेच्या अधीन राहून मे. जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्ट्स लि. यांना या कामाकरिता इरादापत्र देण्यात यावे. सदर मान्यता प्राप्त झाल्यानंतर मे. जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्ट्स लि. यांना कार्यारंभ आदेश देण्याबाबत कार्यवाही करावी.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.४ : प्राधिकरणाची माहिती सर्वसामान्य जनतेपर्यंत प्रभावीरित्या पोहोचविण्याकरिता जनसंपर्क सल्लागार संस्थेची नियुक्ती, लघु चित्रफीतीची निर्मीती व प्रसारणास मान्यता मिळण्याबाबत.**

४.१ या प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणातर्फे प्रामुख्याने राबविण्यात आलेल्या प्रकल्पांची आणि भविष्यात राबविण्यात येणा-या प्रकल्पांची सविस्तर माहिती सांगितली. प्राधिकरणाच्या विविध प्रकल्पांची माहिती निरनिराळया प्रसिध्दी माध्यमांव्दारे विस्तृतपणे सर्व सामान्य नागरिकांना प्राप्त व्हावी यादृष्टीने प्राधिकरणास जनसंपर्क संस्थेची आवश्यकता होती. त्याकरिता इच्छुक जनसंपर्क संस्थांकडून विनंती प्रस्ताव मागविण्यासाठी वर्तमानपत्रांमधून जाहिरात प्रसिध्द करण्यात आली. त्यानुसार मे.ब्रॅण्ड सेल, मे.पॅरमिन ॲडव्हर्टायझिंग ॲण्ड मार्केटिंग असोसिएटस, मे. लिन ओपीनियन आणि मे.ॲडफॅक्टर्स पीआर. प्रा. लि. या चार जनसंपर्क संस्थांचे प्रस्ताव दिनांक २२ जुलै, २०१३ रोजी प्राप्त झाले होते.

४.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, उपरोक्त प्रस्तावांचे मुल्यमापन करण्यासाठी अतिरिक्त महानगर आयुक्त (१) यांच्या अध्यतेखाली स्थापन करण्यात आलेल्या मुल्यमापन समितीसमोर चारही जनसंपर्क संस्थांनी दिनांक ११ ऑक्टोबर, २०१३ व १९ डिसेंबर, २०१३ रोजी सादरीकरण केले. त्यांनी सादरीकरण केल्यानंतर प्रस्तावांचे मुल्यमापन करण्यासाठी १०० गुणांच्या मुल्यमापन निकषांवर चारही संस्थांची मुल्यमापन समितीतर्फे पडताळणी करण्यात आली. यापैकी ८० गुण तांत्रिक निकषासाठी तर २० गुण आर्थिक प्रस्तावासाठी होते. तसेच अंतिमतः पात्र ठरण्यासाठी संस्थेने तांत्रिक निकषासाठी किमान ७५ % गुण मिळविणे आवश्यक होते. मुल्यमापन समितीने तांत्रिक निकषांवर पात्र ठरविलेल्या मे.ॲडफॅक्टर्स पीआर. प्रा. लि. आणि मे. लिन ओपीनियन यांचे आर्थिक प्रस्ताव दिनांक २६ डिसेंबर, २०१३ रोजी उघडण्यात आले. त्यानुसार मे.ॲडफॅक्टर्स पीआर. प्रा. लि. यांचा आर्थिक प्रस्ताव प्रति माहे रु.७,५०,०००/- (रुपये सात लाख पन्नास हजार फक्त) होता, तर मे. लीन ओपिनियन यांचा आर्थिक प्रस्ताव प्रति माहे रु.८,००,०००/- (रुपये आठ लाख फक्त) इतका होता. त्यामुळे समितीने मे.ॲडफॅक्टर्स पीआर. प्रा. लि. यांची प्राधिकरणाचे जनसंपर्क सल्लागार म्हणून नेमणूक करण्याचा निर्णय घेतला. मे.ॲडफॅक्टर्स पीआर. प्रा. लि. यांच्यासोबत वाटाघाटी केल्यावर प्रति माहे फी रु.७,५०,०००/- वरुन रु.७,००,०००/- इतकी करण्यात आली. त्यानुसार मे.ॲडफॅक्टर्स पीआर. प्रा. लि. यांची रु.७,००,०००/- प्रति माहे या फी वर जनसंपर्क सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली.

..७/-

४.३ त्यानंतर महानगर आयुक्त यांनी असे नमूद केले की, मे.ॲडफॅक्टर्स पीआर. प्रा. लि. यांची प्रथमतः दिनांक १६ जानेवारी, २०१४ ते १५ जुलै, २०१४ या सहा महिन्यांच्या कालावधीसाठी प्रति माहे रु.७,८६,५२०/- (सेवा शुल्कासह) याप्रमाणे रु.४७,१९,१२०/- (सेवा शुल्कासह) इतक्या फी वर नेमणूक करण्यात आली. या सहा महिन्यांच्या काळात सदर जनसंपर्क संस्थेचे काम समाधानकारक आढळून आल्यामुळे सदर संस्थेला १६ जुलै, २०१४ ते १५ जानेवारी, २०१५ पर्यंत सहा महिन्यांकरिता पूर्वीच्याच अटी व शर्ती आणि फी नुसार मुदतवाढ देण्यात आली.

४.४ या संदर्भात श्री. ना. वि. मेराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी भविष्यामध्ये जनसंपर्क संस्थेची नियुक्ती करताना मुल्यमापन समितीमध्ये महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील संचालक दर्जाचा अधिकारी सदस्य म्हणून ठेवण्यात यावा असे मत व्यक्त केले. त्याबाबत प्राधिकरणाचे अतिरिक्त महानगर आयुक्त (१) यांनी प्राधिकरणामध्ये भविष्यात जनसंपर्क संस्थेची नियुक्ती करताना मुल्यमापन समितीमध्ये माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील संचालक दर्जाचा अधिकारी सदस्य म्हणून ठेवण्यात येईल असे सांगितले.

४.५ उपरोक्त विषयासंदर्भात मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी सप्टेंबर व ऑक्टोबर, २०१४ या दोन महिन्यांच्या कालावधीत प्राधिकरणाच्या प्रकल्पांच्या प्रसिध्दीची कामे कमी होण्याची शक्यता आहे याबाबत प्राधिकरणाने विचार करण्याची गरज आहे असे सुचविले. या संदर्भात प्राधिकरणाचे अतिरिक्त महानगर आयुक्त (१) यांनी सदर जनसंपर्क संस्थेचे मनुष्यबळ कमी करुन सुधारित फी ठरविण्यात येईल असे सांगितले.

४.६ त्यानंतर बाब टिप्पणीतील प्रस्तावानुसार दिनांक १६ जानेवारी, २०१४ ते १५ जानेवारी, २०१५ या एक वर्षाच्या कालावधीसाठी मे.ॲडफॅक्टर्स पीआर. प्रा. लि. यांची जनसंपर्क सल्लागार संस्था म्हणून नियुक्ती आणि एकूण फी रु.९४,३८,२४०/- (सेवा शुल्कासह) एवढया खर्चास कार्यकारी समितीने कार्योत्तर मान्यता दिली. उपरोक्त कालावधीपैकी सप्टेंबर व ऑक्टोबर, २०१४ या दोन महिन्यांकरिता महानगर आयुक्त यांनी सुधारीत फी निर्धारित केल्यानुसार सदर जनसंपर्क संस्थेला शुल्क अदा करण्यात येईल.

४.७ प्राधिकरणामार्फत राबविण्यात आलेल्या विविध प्रकल्पांवरील लघु चित्रफीत निर्माण करण्याबाबतची माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाने यशस्वीपणे राबविलेल्या प्रकल्पांची माहिती सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी एक लघु चित्रफीत तयार करण्याचे ठरविलेले आहे. त्याकरीता मे.ॲडफॅक्टर्स पीआर.प्रा.लि. यांची प्राधिकरणाचे जनसंपर्क

..८/-

सल्लागार म्हणून नियुक्ती केलेली आहे. त्यांच्या सोबत केलेल्या करारनाम्यामधील कलम ३ (xvii) प्रमाणे "प्राधिकरणाने मंजूर केलेल्या अंदाजित खर्चामध्ये जनसंपर्क संस्थेने छायाचित्रीकरण आणि चित्रफीत तयार करणे" या कामाचा समावेश आहे. सदर तरतुदीप्रमाणे मे.ॲडफॅक्टर्स पीआर.प्रा.लि. यांना प्राधिकरणाने राबविलेल्या प्रकल्पांवर एक उत्तम दर्जाची लघु चित्रफीत निर्माण करण्याचे कळविण्यात आले. त्यानुसार सदर संस्थेने ६० सेकंदांची एक मराठी व एक हिंदी आणि ४५ सेकंदांची एक मराठी व एक हिंदी अशा चित्रफीती प्राधिकरणाकडे दिनांक ८ ऑगस्ट, २०१४ रोजी सादर केल्या.

४.८ या विषयासंदर्भात कार्यकारी समितीचे सदस्य श्री.ना.वि.मेराणी यांनी लघु चित्रफीत निर्मितीचा खर्च वाजवी आहे का अशी विचारणा केली. त्यावर कार्यकारी समितीचे सदस्य श्री.मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग यांनी असे सांगितले की, महाराष्ट्र शासनाने लघु चित्रफीत निर्मितीकरीता कुठलेही डी.एस.आर. दर ठरविलेले नाहीत. तद्नंतर, प्राधिकरणाचे प्रकल्प दर्शविणारी चित्रफीत कार्यकारी समितीच्या बैठकीदरम्यान दाखविण्यात आली. समितीच्या सर्व सदस्यांना ही चित्रफीत आवडली आणि त्यांनी त्याचे 'उत्कृष्ट' अशा शब्दांत वर्णन केले. त्यानंतर महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, लघु चित्रफीत निर्मितीची किंमत ही चित्रफीतीचे दिग्दर्शन कोणी केले आहे यावर ठरते. सदर लघु चित्रफीत नामवंत हिंदी चित्रपट दिग्दर्शक श्री.अभिषेक चौबे यांच्या दिग्दर्शनाखाली निर्माण करण्यात आली आहे. तसेच या चित्रफीतीचे प्रसारण दूरसंचार वाहिन्यांवरुन सध्या होत असून सर्वसामान्य जनतेने त्यास उत्तम प्रतिसाद दिलेला आहे. ही बाब लक्षात घेता, लघु चित्रफीतीच्या निर्मितीची किंमत वाजवी असून उत्तम दर्जाची आहे. त्यामुळे प्राधिकरणाच्या प्रकल्पांवर ६० सेकंदाची एक मराठी व एक हिंदी आणि ४५ सेकंदाची एक मराठी व हिंदी अशा चित्रफीत निर्मितीची किंमत रु.१,१०,००,०००/- अधिक १२.३६ टक्के सेवा शुल्क अशी एकूण रक्कम रु.१,२३,५९,६००/- (रुपये एक कोटी तेवीस लाख एकोणसाठ हजार सहाशे फक्त) असून हया खर्चास कार्यकारी समितीने कार्योत्तर मान्यता दिली.

४.९ लघु चित्रफीतीचे दूरसंचार वाहिन्यांवरुन प्रसारणाच्या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाने यशस्वीपणे राबविलेल्या या प्रकल्पांची माहिती आजपर्यंत वर्तमानपत्रे आणि इतर नियतकालिकांमध्ये नियमितपणे प्रसिध्द करण्यात आलेली आहे. आता प्राधिकरणातर्फे निर्माण करण्यात आलेली लघु चित्रफीत दूरसंचार वाहिन्यांवरुन प्रसारित करण्याचे ठरविले आहे. त्यानुसार प्राधिकरणाने बाब टिप्पणीतील परिच्छेद क्रमांक १४ मध्ये नमूद केलेल्या वाहिन्यांवरुन मे.ॲडफॅक्टर्स पीआर.प्रा.लि. मार्फत प्रसारण करण्यात येत आहे. सदर लघु चित्रफीत दिनांक ८ ऑगस्ट, २०१४ पासून २७ ऑगस्ट, २०१४ पर्यंत मराठी वाहिन्यांवरुन मराठीमध्ये तर हिंदी आणि इंग्रजी

वाहिन्यांवरुन हिंदीमध्ये प्रसारित करण्यात येत आहे. यासाठीचा एकूण खर्च रु. १,८६,५९,४२८/- (सेवा शुल्कासह) (रुपये एक कोटी शहाऐंशी लाख एकोणसाठ हजार चारशे अठ्ठावीस फक्त) इतका आहे. प्राधिकरणातर्फे उपरोक्त चित्रफीत ज्या तारखेपर्यंत विविध वाहिन्यांवरुन प्रसिध्द होईल त्या तारखेपर्यंतच्याच प्रसारणाचा खर्च मे.ॲडफॅक्टर्स पीआर.प्रा.लि. या संस्थेला अदा करण्यात येईल असेही महानगर आयुक्त यांनी सांगितले. सदर खर्चास कार्यकारी समितीने कार्योत्तर मंजूरी दिली.

**निर्णय : त्यानंतर, बाब टिप्पणीतील परिच्छेद क्रमांक १६ मध्ये नमूद केलेल्या प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला : -**

**ठराव क्र. १२६४:**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या सर्व प्रकल्पांची माहिती अधिकाधिक प्रभावीरित्या सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्याकरिता मे. ॲडफॅक्टर्स पीआर. प्रा. लि. या जनसंपर्क संस्थेची दिनांक १६ जानेवारी, २०१४ ते १५ जानेवारी, २०१५ या एक वर्षाच्या कालावधीकरिता रु.९४,३८,२४०/- (सेवा करासह) शुल्कावर केलेल्या नेमणूकीस कार्यकारी समिती कार्योत्तर मंजूरी देत आहे. तसेच उपरोक्त कालावधीपैकी सप्टेंबर व ऑक्टोबर, २०१४ या दोन महिन्यांकरिता महानगर आयुक्त यांनी सुधारित फी ठरविल्यानंतर त्यानुसार शुल्क अदा करण्याची कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** ६० सेकंदांची एक मराठी व एक हिंदी आणि ४५ सेकंदांची एक मराठी व एक हिंदी अशा चित्रफीतींसाठी एकूण रु.१,२३,५९,६००/- (सेवा शुल्कासह) (रुपये एक कोटी तेवीस लाख एकोणसाठ हजार सहाशे फक्त) इतक्या खर्चासही कार्यकारी समिती कार्योत्तर मान्यता देत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** मराठी, हिंदी आणि इंग्रजी वाहिन्यांवरुन लघु चित्रफीत प्रसारित करण्यासाठी एकूण रु.१,८६,५९,४२८/- (सेवा शुल्कासह) (रुपये एक कोटी शहाऐंशी लाख एकोणसाठ हजार चारशे अठ्ठावीस फक्त) इतक्या खर्चासही कार्यकारी समिती कार्योत्तर मान्यता देत आहे.

**“आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे.”

त्यानंतर, मा. अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

----------xox----------